## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

सन २०२२ – २०२३

## प्राथमिक शिक्षक

### नवोपक्रमाचे नाव

## “जाणीव स्पर्शाची : वेळीच शिक्षण, अन्यायापासून रक्षण”



## प्रतिज्ञापत्र

मी श्री/~~श्रीम/डॉ~~ सतिश दिनकर कुंभार प्रतिज्ञापत्र लिहून देतो/~~देते~~ की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला जाणिव स्पर्शाची वेळीच शिक्षण, अत्याचारापासून रक्षण हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

Kumbhar
स्पर्धकाची स्वाक्षरी

दिनांक : 21/11/2022
स्थळ : बावेली

नाव : श्री सतिश दि. कुंभार
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का: विद्या मंदिर बावेली
ता.गगनबावडा जि.कोल्हापूर

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/~~श्रीम/डॉ~~ सतिश दिनकर कुंभार हे माझ्या शाळेत / ~~कार्यालयात~~ कार्यरत असून त्यांनी सादर केलेला जाणीव स्पर्शाची वेळीच शिक्षण, अत्याचारापासून रक्षण हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष --------- मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

दिनांक : 22/11/2022
स्थळ : बावेली

नाव : श्री. दत्तात्रय शंकर सावंत
शिक्का: मुख्याध्यापक
विद्या मंदिर बावेली
ता.गगनबावडा. जि कोल्हापूर

# नवोपक्रमकर्त्याची माहिती



| | |
|---|---|
| स्पर्धकाचे नाव | श्री. सतिश दिनकर कुंभार |
| भ्रमणध्वनी | ८३९००६५६८० |
| ई मेल | satishkumbhar100@gmail.com |
| शाळेचे नाव | विद्या मंदिर, बावेली.<br>ता. गगनबावडा जि. कोल्हापूर |
| कायमचा पत्ता | मु.पो.बाचणी, ता. कागल,<br>जि. कोल्हापूर ४१६२२१ |
| जन्मतारीख | ०५/०१/१९९२ |
| शैक्षणिक पात्रता | M.Sc. B.Ed. D.S.M. M.A.Edu. SET. NET. |
| शिक्षक म्हणून कामाचा अनुभव | जिल्हा परीषद शाळा ३ वर्षे |
| नवोपक्रम शीर्षक | जाणीव स्पर्शाची : वेळीच शिक्षण, अन्यायापासून रक्षण |

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशील | पान नं |
|---|---|---|
| १ | प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र | २ |
| २ | वैयक्तिक माहिती | ३ |
| ३ | नवोपक्रमाचे शीर्षक | ५ |
| ४ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ७ |
| ५ | नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये | ११ |
| ६ | नवोपक्रमाचे नियोजन | १२ |
| ७ | नवोपक्रमाची कार्यपध्दती | २३ |
| ८ | नवोपक्रमाची यशस्वीता /फलनिष्पत्ती | ४३ |
| ९ | समारोप | ४४ |
| १० | संदर्भसूची व परिशिष्टे | ४६ |

## नवोपक्रमाचे शीर्षक :

## “जाणीव स्पर्शाची : वेळीच शिक्षण, अन्यायापासून रक्षण”

विद्या मंदिर, बावेली. ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर या शाळेतील विद्यार्थ्यांना बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधात्मक उपायासंबंधी बालक सुरक्षा किटच्या मदतीने प्रशिक्षण देणे व अवघड परिस्थितीवर मात करण्यासाठी सक्षम बालक घडविणे.

# प्रस्तावना

आजकाल आपल्या अवती भोवती, बऱ्याच चांगल्या वाईट गोष्टी घडत असतात. पण त्या गोष्टींमधून काय घेतलं पाहिजे आणि कोणत्या गोष्टींपासून दूर राहायला हवं किंवा स्वत:ला कसं जपायला हवं हे समजणं गरजेचं आहे.

विशेषत: लहान मुलांच्या बाबतीत लैंगिक अत्याचाराचे प्रकार खूप वाढलेले आहेत आणि अशा केसमध्ये सदर बालकाचा जबाब पोलिसांना गुन्हा सिध्द करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा पुरावा ठरतो. पण वास्तविक बालकाला संबंधित गोष्टी ज्ञात नसल्यामुळे अशा केसमध्ये पोलिसांना बालकाची मदत होण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. अशावेळी एक पालक म्हणून आपण बालकांच्या सुरक्षिततेसाठी काही खास पावले उचलायला हवीत. या संदर्भातील गुन्हेगार हा गुन्हयाची सुरूवात वाईट स्पर्शापासून करतो आणि या सुरूवातीच्याच प्रयत्नात जर बालक त्याला विरोध करू शकला तर नक्कीच हे अन्यायकारक घटना कमी होण्याकडे पहिले पाऊल म्हणावे लागेल. हीच महत्त्वाची गोष्ट आता मी या उपक्रमाच्या माध्यमातून सत्यात उतरवत आहे.

कुणी व्यक्तीने बालकाच्या चुकीच्या अवयवाला स्पर्श केल्यास हे उपकरण बालक असुरक्षित आहे असे सांगून बालकाने कोणत्या गोष्टी करायला हव्यात याबाबत बालकास संबंधित ज्ञान अवगत करते.

सदर उपक्रमाच्या माध्यमातून बाललैंगिक अत्याचार कमी होण्यास मदत तर होईलच त्याचप्रमाणे पोलिस खात्यास अशा घटनांचा तपास करताना आजचे सुजाण बालक मदत करण्यास समृध्द होतील ही अपेक्षा.....

## उपक्रमाची गरज व महत्व

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी भारतामध्ये सर्वच बालके सुरक्षित असलेले दिसत नाहीत. प्रगतशील विज्ञानाच्या युगामध्ये बाल लैंगिक अत्याचाराचे प्रमाण खूपच वाढले आहे.

भारतामध्ये याबाबतीतील महत्त्वाची लक्षवेधी निरीक्षणे खालीलप्रमाणे:

- जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगातील सर्वात जास्त लैंगिक शोषित मुलांची संख्या भारतात आहे.
- भारत महिला व बालविकास मंत्रालयाच्या बालशोषणाचा अभ्यास २००७ च्या अहवालाप्रमाणे लैंगिक शोषण हे अधिकांश १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसोबत होते.
- प्रत्येक १५५ मिनिटामध्ये १६ वर्षाच्या आतील बालकावर बलात्कार होतो.
- नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो २०१५ च्या आकडेवारीनुसार लहान मुलांविषयी एकूण ९४,१७२ अपराध नोंदवले गेले आहेत.
- बाल लैंगिक अत्याचार शक्यतो ओळखीतील व्यक्तीकडूनच झालेले पहायला मिळतात.
- भीतीमुळे पीडित बालक अत्याचाराबद्दल कुणालाही सांगण्यास घाबरते त्यामुळे बरेच अत्याचार उघडकीस येत नाहीत.

वरील बाब इतकी गंभीर असून देखील शाळास्तरावर विदयार्थ्यांमध्ये याबाबतीत जाणीव करून देण्यासाठी अत्यल्प प्रयत्न होताना दिसतात.

वरील भयानक सत्य पाहता बाल लैंगिक अत्याचारासाठी आरोपी खालील बाबींचा अवलंब करतात.

- बालकाच्या लैंगिक अज्ञानाचा गैरफायदा.
- नातेवाईकांच्या मर्यादांबद्दलच्या अज्ञानाचा फायदा घेणे.
- बालकाच्या आवडीच्या गाष्टींची माहिति घेवून आमिषे दाखवणे.
- बालकाच्या नातेवाईकांशी नातेसंबंध असल्यास त्याचा फायदा घेऊन जवळीक निर्माण करणे.
- बालकाला भीती घालणे.

याचाच विचार करून मी आपल्या शाळेमध्ये एक नवोपक्रम राबविण्याचे ठरविले आणि सदर उपक्रम राबविल्यानंतर मिळालेले यश या नवोपक्रमाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

अनेक पालक या महत्वपूर्ण गोष्टीकडे दुर्लक्ष करतात आणि मग अशी घटना घडली की हातात पश्चातापाशिवाय काहीच उरत नाही. हे होवू द्यायचे नसेल तर आपण या गोष्टीकडे आवर्जून लक्ष घालून या उपकरणाचा उपयोग शालेय स्तरावर करून त्याबाबत विद्यार्थी तसेच पालकांमध्ये जागृती करणे गरजेचे आहे.

सध्याचा बालकांच्या असुरक्षिततेचा विचार करता सदर प्रकल्प आपल्या शिक्षण विभागामार्फत सर्व शाळेमध्ये अनिवार्य केल्यास आपले विद्यार्थी निश्चितपणे जागृत होवून बाल लैंगिक अत्याचार कमी होण्यास मदत होईल असे मला वाटते.

# उपयुक्तता

बदलत्या घाई गडबडीच्या व्यस्त जमान्यात पालकांना आपल्या पाल्याला पुरेसा वेळ देणे अवघड झाले आहे. किंबहुना मोबाईलच्या आहारी गेलेले पालक आपल्या मुलांना पुरेसा वेळ देताना दिसत नाहीत. परिणामी योग्य वयामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या आरोग्याविषयी शिक्षण मिळताना दिसत नाही. तसेच आमची शाळा तही दुर्गम भागामध्ये असल्याने बहुतांशी पालक हे शेतीच्या कामामध्ये व्यस्त असताना दिसतात व त्यामुळे या भागातील मुलांमध्ये चांगला वाईट स्पर्श याबाबत कमालीचे अज्ञान पहायला मिळते.

सदर बाब लक्षात घेवून मी बालक सुरक्षा किट नावाच्या शैक्षणिक साधनाची निर्मिती केली आणि त्या उपकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण होण्यास खूप मदत झाली. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा आत्मविश्वास निर्माण झाला असून विद्यार्थी लैंगिक अत्याचारासारख्या वाईट संकटप्रसंगी स्वत:ची सोडवणूक करण्याचे मार्ग तसेच उपयायोजना व कृती शिकले. त्यामुळेच हा उपक्रम प्राथमिक स्तरावर राबवला तर भविष्यकालीन जीवनासाठी आपले विद्यार्थी खंबीरपणे वाईट प्रंसंगाला तोंड देण्यास सक्षम बनतील आणि हीच खरी या उपक्रमाची उपयुक्तता आहे.

## *नवोपक्रमाचे वेगळेपण*

मुळात माझ्या उपक्रमाचा विषय नियमित अभ्यासक्रमापासून वेगळा आहे. आपल्या लैंगिक आरोग्याविषयी योग्य वेळी विद्यार्थी सज्ञान होणे गरजेचे आहे आणि हेच शिक्षण या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देता येते. बाल लैंगिक अत्याचार, त्याची कारणे, पोक्सो कायदा, कठीण प्रसंगी करावयाच्या उपाययोजनांची माहिती या बाबी विद्यार्थ्यांपर्यंत सहज आणि सोप्या पध्दतीने मांडण्यासाठी बालक सुरक्षा किटची निर्मिती आणि त्यातून सक्षम बालक घडविणे हेच या उपक्रमाचे वेगळेपण म्हणावे लागेल.

बालक सुरक्षा किटच्या माध्यमातून विद्यार्थी सहजपणे वाईट आणि चांगला स्पर्श याबाबत माहिती घेवू शकतो. पोलिस स्टेशनच्या भेटीमधून मिळालेल्या माहितीनुसार सध्या याच विषयावर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये निर्भया पथकाचे कार्य अतिशय छान पध्दतीने सुरू असून हे शैक्षणिक साधन निर्भया पथकालादेखील उपयोगात येवू शकते जेणेकरून त्यांच्या कामामध्ये सुलभता येवू शकते.

# उद्दिष्ट्ये

१. अज्ञान बालकांना वेळीच योग्य लैंगिक शिक्षण देणे.

२. सुरक्षित व असुरक्षित व्यक्ती यांच्या मर्यादांची जाणीव करून देणे.

३. सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याबद्दल वेळीच विद्यार्थ्यांच्या मनात जागरूकता निर्माण करणे.

४. कठीण प्रसंगी करावयाच्या उपाययोजनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

५. बाललैंगिक अत्याचारासंबंधीच्या पोक्सो कायद्याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करणे.

६. विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करून पोलिस खात्यास बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये सुलभीकरणास मदत करणे.

७. एकंदरीत सुजाण आणि सुरक्षित बालक घडवणे.

# <u>नवोपक्रमाचे नियोजन</u>

## १) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण

समाजामध्ये घडत असलेले वाढते बाललैंगिक अत्याचार आणि वाढते गुन्हेगारी यांचा विचार करता मी बाल सुरक्षा किट नावाचे शैक्षणिक साधनाची निर्मिती केली आणि सदर उपकरण हे संबंधित विषयातील विद्यार्थ्यांचे ज्ञान तपासण्याचे साधन बनले.

तयार केलेले बालक सुरक्षा किट हे मी बारमती सायन्स सेंटरमध्ये भरवणेत आलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये मांडले. सदर प्रदर्शनास तब्बल १२००० विद्यार्थ्यांनी भेट दिली. सदर प्रदर्शनात मला जवळपास ८०टक्के विद्यार्थ्यांमध्ये बाललैंगिक अत्याचारासंबंधित अज्ञान असल्याचे जाणवले.

त्याचपध्दतीने भेट दिलेल्या बऱ्याच शिक्षकांनी सदर उपक्रम शाळेत राबविणे गरजेचे असल्याचे मत मांडले.

त्याचपध्दतीने माझ्या शाळेतील बहुतांशी विद्यार्थ्यांना या विषयातील ज्ञान नव्हते. हा विषय त्यांच्यासाठी पूर्णपणे नवीन होता.

त्यामुळे या विषयासंबंधित पूर्वचाचणी घेऊन, सदर उपक्रम हा आमच्या शाळेमध्ये राबविण्याचे मी ठरविले. आणि योग्य नियोजन व प्रशिक्षणाची आखणी करून सदर उपक्रम यशस्वी करण्याचे ठरविले आणि नियोजन केले.

# तज्ज्ञांशी चर्चा आणि मार्गदर्शन

सदर समस्येवर उपक्रम राबविण्याचे ठरवल्यावर विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये श्री. आर. व्ही. कांबळेसाो (गटशिक्षणाधिकारीसाो पं.स.गगनबावडा), श्री. आर. आर. कुंभारसो (विस्तार अधिकारी, पं.स. गगनबावडा) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

श्री. डि. एस्. सावंत मुख्याध्यापक, वि.मं.बावेली तसेच सर्व शिक्षक स्टाफ यांचेही मार्गदर्शन लाभले.

श्री. संगमेश कोडे सर ( तहसिलदारसाो गगनबावडा) यांचेही या विषयात वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

श्री. धर्मेंद्र भोसले (पोलिस हेड कॉन्स्टेबल, गगनबावडा पालिस ठाणे) यांनीही या उपक्रमासंदर्भात बहुमोल मार्गदर्शन केले.



# आवश्यक साधनांचा विचार आणि साहित्य

जाणीव स्पर्शाची उपक्रम राबवत असताना खालील साधने आणि साहित्याचा वापर केला.

साधने :

प्रश्नावली

निरीक्षण

आलेख व शेकडेवारी

टिव्ही संच

शैक्षणिक साधन निर्मिती : बालक सुरक्षा किट



# करावयाच्या कृतींचा क्रम

1. बाल लैंगिक अत्याचारासांबंधीच्या घटनांचा प्रसारमाध्यमांचा वापर करून अभ्यास
2. संबंधित घटनांमागील कारणे शोधून समस्या निश्चितीकरण
3. सदर शैक्षणिक साधनाद्वारे सायन्स सेंटर बारामतीमध्ये सादरीकरणाद्वारे विद्यार्थी पूर्वज्ञान चाचपणी
4. समस्येला अनुसरून बालक सुरक्षा किट या शैक्षणिक साधनाची निर्मिती
5. शाळेमध्ये पूर्वचाचणी घेणे
6. तीन दिवस विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण आयोजित करणे
7. उत्तर चाचणी घेवून उपक्रमाची फलनिष्पत्ती आणि निष्कर्ष काढणे.

# उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

१. उपलब्धतेनुसार विद्यार्थी वर्तमानपत्र वाचू लागले.

२. टि. व्ही. वर बातम्या पाहण्याचे मुलांमधील प्रमाण वाढले.

३. बाल लैंगिक अत्याचाराबाबत बालक सज्ञान झाले.

४. बालक आपल्या शरीराचे सुरक्षित व असुरक्षित अवयव याबाबत आत्मविश्वासपूर्वक माहिती देवू लागले.

५. बालक आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींपैकी सुरक्षित व असुरक्षित व्यक्ती याबाबत स्पष्टपणे वर्गीकरण करू लागले.

६. बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा पोक्सा बाबत विद्यार्थी सज्ञान झाले.

७. आपल्यावर लैंगिक अत्याचारासारखा वाईट प्रसंग ओढवला तर करवयाच्या उपाययोजना विद्यार्थी स्पष्टपणे सांगू लागले.

८. चाईल्ड हेल्पलाईन बद्दल बालक स्पष्टपणे माहिती देवू लागले.

९. सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याबाबत बालक पूर्णपणे आत्मविश्वासपूर्वक सज्ञान झालेले दिसले.

१०. एकंदरीत बालकामध्ये संबंधित विषयाबद्दल ज्ञान, जागृती आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

# कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)

या नवोपक्रमासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही टप्पे निश्चित करण्यात आले.

| अ.क्र. | कार्यवाही | वेळ |
|---|---|---|
| १ | तज्ज्ञांशी चर्चा | मार्च २०२२ |
| २ | नवोपक्रमाची निवड | एप्रिल २०२२ |
| ३ | विद्यार्थी,मुख्याध्यापक यांचेशी चर्चा | एप्रिल २०२२ |
| ४ | बालक सुरक्षा किट तयार करणेसाठी साधन सामग्री उपलब्ध करणे. | मे २०२२ |
| ५ | बालक सुरक्षा किट निर्मिती | जून २०२२ |
| ६ | बालक सुरक्षा किटद्वारे प्रदर्शन व पूर्वज्ञान तपासणी | जून २०२२ |
| ७ | नवोपक्रमाचा आराखडा तयार करणे | जुलै २०२२ |
| ८ | पूर्वचाचणी व तिचे मूल्यमापन | जुलै २०२२ |
| ९ | तज्ञांचे मार्गदर्शन | ऑगस्ट २०२२ |

# उपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही

| अ.क्र. | कृती | तारीख |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण दिवस पहिला (मुली) | २४ ऑगस्ट २०२२ |
| २ | प्रशिक्षण दिवस दुसरा (मुली) | २५ ऑगस्ट २०२२ |
| ३ | प्रशिक्षण दिवस तिसरा (मुली) | २६ ऑगस्ट २०२२ |
| १ | प्रशिक्षण दिवस पहिला (मुले) | १२ सप्टेंबर २०२२ |
| २ | प्रशिक्षण दिवस दुसरा (मुले) | १३ सप्टेंबर २०२२ |
| ३ | प्रशिक्षण दिवस तिसरा (मुले) | १४ सप्टेंबर २०२२ |

## उपक्रमासाठी इतरांची मदत :

सदर उपक्रम राबवत असताना माझे सहकारी श्री. विपुल प्रभाकर भगत अध्यापक वि.मं.बावेली यांची प्रशिक्षणादरम्यान खूप मदत झाली.

सदर उपक्रमाच्या विविध टप्प्यावर मा. श्री. आर. आर. कुंभार साहेब (विस्तार अधिकरी, पंचायत समिती गगनबावडा) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

गगनबावडा तालुक्याचे तहसिलदारसाो यांनी सदर उपक्रमामध्ये मार्गदर्शन देवून सदर उपक्रम हा नाविन्यपूर्ण पथदर्शी स्वरूपाचा उपक्रम म्हणून त्याची दखल घेतली व गगनबावडा तालुक्यातून उपक्रमाची निवड केली.

त्याचप्रमाणे गगनबावडा पोलिस स्टेशनचे असिस्टंट पोलिस निरीक्षक श्री. रणजित पाटील सर यांचेही मार्गदर्शन लाभले.

# उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

१. निर्मिती केलेल्या बालक सुरक्षा किटची माहिती

लिंक http://youtu.be/phIM4_siU18

२.उपक्रमादरम्यान पोक्सा कायद्याविषयी मार्गदर्शन

लिंक http://youtu.be/VQs1d2R-JSk

३. उपक्रमानंतर प्रश्नोत्तरे सत्रात मूल्यमापन घेताना

लिंक https://youtu.be/-4ExZ45Dq-8

४. गगनबावडा पोलिस स्टेशनमध्ये उपक्रमाबद्दल माहिती देताना

लिंक http://youtu.be/YQysdz5buh8

१. मा. श्री. संगमेश कोडे तहसीलदार गगनबावडा यांचा अभिप्राय


लिंक http://youtu.be/urRILRoBH2U

## २.कु. तृप्ती राहूल कांबळे इ. ६वी हिचा अभिप्राय

लिंक [http://youtu.be/FAcTQj3J6vQ](http://youtu.be/FAcTQj3J6vQ)

## ३.कु. ऋतुजा तानाजी ऱ्हायकर इ. ७ हिचा अभिप्राय

[http://youtu.be/a7S7VE3j0tw](http://youtu.be/a7S7VE3j0tw)



अभिप्राय

अभिप्रायकर्त्याचे नाव : श्री. संगमेश कोडे

पद/ हुद्दा : तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी.


मोबा. क्र : गगनबावडा

अभिप्राय : विद्या मंदिर, बावेली या प्रशालेत राबविण्यात आलेला 'जाणीव स्पर्शाची: वेळीच शिक्षण अन्यायापासून रक्षण' हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांसाठी बदलत्या जीवनमानानुसार अत्यावश्यक उपक्रम आहे. सदर उपक्रम प्राथमिक शाळेबरोबरच माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर राबविणे मला गरजेचे वाटते.

सदर उपक्रम राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत नाविन्यपूर्ण व पथदर्शी स्वरुपाचा उपक्रम म्हणून गगनबावडा तालुक्यातून निवड होवून जिल्हा स्तरासाठी पाठविण्यात आला आहे.

आपल्या उपक्रमास सदिच्छा...

तहसिलदार गगनबावडा



अभिप्राय

अभिप्रायकर्त्याचे नाव : श्री धर्मेंद्र भोसले.

पद/ हुद्दा : पो हे कॉ 1795 नेम गगनबावडा पो ठाणे

मोबा. क्र : 9823089394

अभिप्राय : विद्या मंदिर, बावेली या प्रशालेत राबविण्यात आलेला 'जाणीव स्पर्शाची वेळीच शिक्षण अत्याचारा पासून रक्षण' ह्या उपक्रम बद्दल माहिती मिळाली सदर शाळेने बनवलेले बालक सुरक्षा किट हे विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. तसेच या उपक्रमामुळे लैंगिक अत्याचाराच्या घटना वर मरकाव आणणे सुलभ होईल.

तसेच त्यांना विद्यार्थींना निर्भया पथक व डायल 112 संदर्भात विद्यार्थींना माहिती देणे बाबत सूचना देण्यात आहेत.

आपल्या उपक्रमास सदिच्छा!

ठाणे अंमलदार

गगनबावडा पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर.

अभिप्राय

अभिप्रायकर्त्याचे नाव : श्री धर्मेंद्र भोसले.

पद/ हुद्दा : पो हे कॉ 1795 नेम गगनबावडा पो ठाणे

मोबा. क्र : 9823089394

अभिप्राय : विद्या मंदिर, वावेली या प्रशालेत राबविण्यात आलेला 'जाणीव स्पर्शाची वेळीच शिक्षण सवयीपासून रक्षण' या उपक्रम बद्दल माहिती मिळाली. सदर शाळेने बनवलेले बालक सुरक्षा किट हे विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. तसेच या उपक्रमामुळे लैंगिक अत्याचाराच्या घटनांवर प्रतिबंध आणणे सुलभ होईल.

तसेच त्यांना विद्यार्थ्यांना निर्भया पथक व डायल 112 संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देणे बाबत सूचना देण्यात आल्या. आपल्या उपक्रमास सदिच्छा!

ठाणे अंमलदार
गमनबावडा पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर.

# नवोपक्रमादरम्यानची काही छायाचित्रे









# नवोपक्रमाची कार्यपध्दती

## पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी

बावेली ता. गगनबावडा हे गाव पूर्णपणे दाजीपूर अभयारण्य भागामध्ये डोंगराच्या कुशीत वसल्याने मुलांना वर्तमानपत्रातील बातम्या, बाल लैंगिक अत्याचार यासंबंधित घटना याबाबत विद्यार्थ्यांना काहीच माहिती नव्हती. बाललैंगिक अत्याचाराच्या घटना रोखण्याच्या हेतूने संबंधित विषयातील ज्ञानाची तपासणी करताना खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. शाळेतील बहुतांशी विद्यार्थी वर्तमानपत्र वाचत नव्हते.

२. बाललैंगिक अत्याचार ही संकल्पनाच सर्व विद्यार्थ्यांसाठी नवीन होती.

३. आपल्या शरीराचे सुरक्षित व असुरक्षित अवयव याबाबत विद्यार्थ्यांना काहीच माहिती नव्हती.

४. नातेवाईकांचे वर्गीकरण विद्यार्थ्यांना करता येत नव्हते.

५. पोक्सो कायद्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती नव्हती.

६. कठीण प्रसंगी करावयाच्या उपाययोजनांबाबत विद्यार्थी अनभिज्ञ होते.

वरील बाबींचा विचार करून मी ऑगस्ट २०२२ मध्ये शाळेमधील इयत्ता ५ ची ते ७ वी च्या विद्यार्थ्यांची पूर्वचाचणी घेतली.

# कार्यवाहीदरम्यान केलेली निरीक्षणे व माहितीचे संकलन

सदर उपक्रम पंचायत समिती गगनबावडा अंतर्गत विद्या मंदिर, बावेली ता. गगनबावडा जि. कोल्हापूर या प्रशालेमधील पदवीधर अध्यापक मी श्री. सतिश दिनकर कुंभार यांनी श्री विपुल भगत सर यांच्या सहकार्याने व शाळेचे मुख्याध्यापक श्री. डी.एस्.सावंत सर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला.

या प्रशिक्षणामध्ये शाळेतील ५वी ते ७वी या इयत्तांचे एकूण ६९ विद्यार्थी सहभागी झाले. सर्वच विद्यार्थ्यांमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण करण्याचे काम या प्रशिक्षणाने सुलभ झाले.

सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना बालक सुरक्षा किटच्या मदतीने विविध प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. सदर प्रशिक्षणासाठी खाली नमूद कार्यपध्दती वापरण्यात आली.



# प्रशिक्षण सुरूवात

## दिवस पहिला

### सत्र १ : ओळख आपली आपली......

१ पहिल्या दिवशी विद्यर्थ्यांना आपल्या शरीराविषयी पूर्ण माहिती दिली. ज्यामध्ये आपल्या केसापासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व अवयवांबद्दल त्यांच्या उपयोगाबद्दल माहिती विद्यर्थ्यांना दिली.

आपल्या शरीराचे असे भाग जे समाजातील सर्व घटक पाहू शकतील.

१. डोके
२. तोंड
३. मान
४. हात
५. पाय

आपल्या शरीराचे असे भाग ज्यावर फक्त आणि फक्त आपलाच हक्क आहे. जे आपल्या व्यतिरिक्त दुसरे कुणीही पाहू किंवा त्याला स्पर्श करू शकत नाही.

१. छाती
२. पोट
३. गुप्तांगे
४. मांड्या

वरील बाबी समजून सांगण्यासाठी शिक्षकांनी छोटया बाहुल्यांचा उपयोग केला जेणेकरून विद्यार्थ्याला संकल्पना स्पष्ट होतील.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्याला आपल्या शरीराची पूर्ण माहिती दिल्यानंतर त्याच्या मनामध्ये शरीराचे असे भाग ज्यावर फक्त त्याचाच हक्क आहे अशा भागांची काळजी घण्याबाबत त्याच्या मनामध्ये विश्वास निर्माण केला.

## सत्र २: ओळख नातेवाईकांची

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्याला आपल्या नातेवाईकांबाबत माहिती द्यावी जे सतत बालकाच्या जवळ आणि संपर्कात असतात.

नातेवाईक

- आई
- बाबा
- आजी
- आजोबा
- भाऊ बहिण
- काका काकी
- शिक्षक
- मित्र मैत्रिणी
- डॉक्टर
- बस ड्रायव्हर
- नोकर वर्ग
- शाळेतील शिपाई
- अनोळखी व्यक्ती

वरील प्रत्येक व्यक्तीबाबत विद्यार्थ्यांना माहिती देवून वरील व्यक्ती आपल्यासोबत किती वेळ असतात आणि त्यांचे वागणे कसे असते याबाबत वर्गात चर्चा घडवून आणली. तसेच आपले शरीर आणि वरील नातेवाईक यांचा कसा संपर्क येवू शकतो याबाबत बालकांना माहिती दिली.

## सत्र ३: नातेवाईकांचे वर्गीकरण आणि मर्यादा...

नातेवाईकांचे मुख्यत्वे ३ गटांमध्ये वर्गीकरण केले

१. पूर्णपणे सूरक्षित

- आई
- वडील
- आजी
- आजोबा
- भाऊ बहिण

२. सूरक्षित

- शिक्षक
- डॉक्टर

३. विशिष्ट परिस्थितीमध्ये असुरक्षित

- नातेवाईक
- मित्र मैत्रिणी
- बस ड्रायव्हर
- नोकर वर्ग
- शेजारी
- अनाळखी व्यक्ती

वरील बाबतीत सांगता येईल की पूर्णपणे सुरक्षित व्यक्ती आपल्या पूर्ण शरीराला स्पर्श करू शकतात. त्यांनी स्पर्श केला तर घाबरायची गरज नाही.

ज्या व्यक्ती फक्त सुरक्षित सांगितल्या आहेत त्या फक्त आपल्या शरीराच्या अशा घटकांना स्पर्श करू शकतात जे आपण पूर्ण कपडे घातल्यानंतर जे अवयव उघडे राहतात, पण काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये या व्यक्ती आपल्या हक्काच्या अवयवांना स्पर्श करू शकतील. जसे की डॉक्टर आई वडीलांच्या उपस्थितीमध्ये आपल्या हक्काच्या अवयवांना स्पर्श करू शकतील.

ज्या व्यक्ती काही विशिष्ट परिस्थितीमध्ये असुरक्षित सांगितल्या अशा व्यक्ती फक्त आणि फक्त आपल्या शरीराच्या अशा घटकांना स्पर्श करू शकतात जे आपण पूर्ण कपडे घातल्यानंतर जे अवयव उघडे राहतात.

वरील सर्व बाबी समजून देण्यासाठी खालील तक्ता वापरला.

| | डोके | चेहरा | मान | हात | पाय | ओठ | छाती | गुप्तांगे | मांड्या | पोट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आई | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित |
| वडील | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित |
| आजी | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित |
| आजोबा | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित |
| भाऊ बहिण | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित |
| शिक्षक | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |
| डॉक्टर | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नातेवाईक | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |
| मित्र मैत्रिणी | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |
| बस ड्रायव्हर | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |
| नोकर वर्ग | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |
| शेजारी | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | सुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |
| अनोळखी व्यक्ती | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित | असुरक्षित |

पहिला दिवस प्रशिक्षण पूर्ण.......

# शैक्षणिक साधन निर्मिती

वरील बाब विद्यार्थ्यांना पूर्णपणे लक्षात येण्यासाठी मी एका शैक्षणिक उपकरणाची निर्मिती केली आहे. ज्यामध्ये ३ लाकडी बॉक्स असून एका बॉक्सवर सर्व संबंधित नातेवाईक, दुसऱ्या बॉक्सवर विद्यार्थी व विद्यार्थिनीचे सुरक्षित व असुरक्षित अवयवांसहीत चित्र आणि तिसऱ्या बॉक्सवर असुरक्षित वेळी करावयाच्या उपाययोजना अशा पद्धतीची रचना असणारे उपकरण आहे.

प्रत्येक नातेवाईकाच्या नावाजवळ एक वायर असून त्याला पिन आहे. तसेच ज्या बॉक्सवर विद्यार्थ्याचे चित्र आहे त्यावर आपल्या शरीराचे सुरक्षित आणि असुरक्षित सर्व अवयव पिन लावून दाखवले आहेत. ज्या वेळी बालक कोणत्याही एका नातेवाईकाच्या चित्राजवळ असणारी पिन विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीच्या शरीरावर असणाऱ्या अवयवांवरील पिनमध्ये लावेल तेव्हा उपकरणावरील सुरक्षित व असुरक्षित स्पर्श दर्शवणारी यंत्रणा सदर स्पर्श सुरक्षित आहे की असुरक्षित आहे हे बल्ब आणि बजरच्या सहाय्याने दाखवेल.त्याचवेळी अशा परीस्थितीमध्ये कोणती उपाययोजना कराल याबाबतही मार्गदर्शन करेल.

अशा पध्दतीने मनोरंजकरित्या विद्यार्थ्यांना स्पर्शाबाबत अवगत करता येईल. सदर प्रात्यक्षिक बालक सुरक्षा किट या शैक्षणिक साधनाच्या सहाय्याने दुसऱ्या दिवशी घेणेत आले.

दिवस दुसरा

जाणीव स्पर्शाची: वेळीच शिक्षण, अन्यायापासून रक्षण

बालक सुरक्षा किट प्रात्यक्षिक

## सत्र १ : सुरक्षित स्पर्श

बालकांना आई बाबा किंवा एखादी जवळची व्यक्ती प्रेमाने, चांगल्या उद्देशाने स्पर्श करीत असेल तर त्याला सुरक्षित स्पर्श तथा गुड टच म्हणता येईल. त्या स्पर्शातून प्रेमाची, आपलेपणाची, काळजीची आणि सुरक्षिततेची भावना मनात निर्माण होते.

उदा. आईने प्रेमाने मिठी मारणे, जवळच्या व्यक्तीने शाबासकी देणे

म्हणजे सुरक्षित स्पर्श तथा गुड टच होय.

बाल सुरक्षा किटच्या मदतीने सदर प्रात्यक्षिक करून दाखवून सुरक्षित स्पर्शाची ओळख पटवून दिली.

## सत्र २ : असुरक्षित स्पर्श

एखादी व्यक्ती आपल्याला वाईट हेतूने स्पर्श करण्याचा प्रयत्न करते. शरीराच्या कोणत्याही भागावरून वारंवार हात फिरवणे, गुप्त अवयवांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे असुरक्षित स्पर्श तथा बॅड टच होय. अशा स्पर्शाने आपल्याला भीती वाटते, अस्वस्थ वाटते. आपल्या एखाद्या अवयवाला स्पर्श करून, कोणाला सांगू नकोस असे सांगितले जात असेल तर त्यास असुरक्षित स्पर्श म्हणता येईल.

बाल सुरक्षा किटच्या मदतीने सदर प्रात्यक्षिक करून दाखवून असुरक्षित स्पर्शाची ओळख पटवून दिली.

<u>सत्र ३ : मी काय करावे</u>

असुरक्षित स्पर्श झाल्याची जाणीव झाल्यास बालकाने काय उपाययोजना कराव्या याबाबत बालक सुरक्षा किटच्या मदतीने खालील बाबी बालकांना अवगत केल्या.

१. मोठ्याने नाही म्हणणे.

२. सुटकेसाठी चावा घेणे

३. प्रतिकार करून पळून जाण्याचा प्रयत्न करणे.

४. मोठ्या आवाजात मदत मागणे.

५. घडलेली घटना परिस्थितीनुसार मुख्याध्यापक, शिक्षक अथवा पालकांना सांगणे.

६. शक्य असल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर किंवा ११२ या नंबरवर फोन करणे.

दुसरा दिवस प्रशिक्षण पूर्ण ..........



# दिवस तिसरा

## सत्र १ : पोक्सो ॲक्ट (२०१२) विषयी माहिती देवून विद्यार्थ्यांना जागृत करणे.

हा कायदा बाललैंगिक अत्याचार आणि चाईल्ड पॉर्नोग्राफी यासारख्या गुन्ह्यांसाठी तयार करण्यात आला. नोव्हेंबर २०१२ मध्ये हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याद्वारे लैंगिक छळ, लैंगिक शोषण,विनयभंग आणि अल्पवयीन मुलांवर पॉर्नोग्राफी अशा लैंगिक गुन्ह्यांमध्ये कारवाई केली जाते.

बालकांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या नोंदवल्या जाणाऱ्या गुन्ह्यांची संख्या वेगाने वाढत आहे. याचे एक कारण समाजात वाढलेली जागरूकता असे असले तरी बालकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या संख्येत झालेली मोठी वाढ हेच महत्त्वाचे कारण आहे असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

## सत्र २ : उत्तर चाचणी घेवून मुलांना संबंधित विषयाचे आकलन किती झाले याची पडताळणी करून नोंद घेणे.



## सत्र ३ :बाल अत्याचार संबंधित घटनांवर चर्चा, यु ट्युब बातमी रिपोर्ट दाखविणे तसेच विचारमंथन.

दाखला १) केरळ मधील उच्च न्यायालयाने एका ९ वर्षीय बालकाच्या जबाबावरून ५४ वर्षीय व्यक्तीला ५ वर्षाची शिक्षा आणि २५ हजारांचा दंड ठोठावला. बालकाने न्यायालयात सांगितले की, त्या व्यक्तीने जे केले ते असुरक्षित स्पर्श होता आणि त्याच्या शाळेमध्ये त्याला याबाबत माहिती देण्यात आलेली होती.

दाखला २) राजस्थानमधील एका जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कमर चौधरी यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील सरकारी आणि खासगी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याची माहिती दिली गेली.

दाखला ३) बीबीसी न्यूज वरील बाल लैंगिक अत्याचारा व पोक्सो कायद्यासंबंधी व्हिडीओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण केली.

विद्यार्थ्यांचे अभिप्राय व प्रतिक्रिया घेवून प्रशिक्षणाचा समारोप केला.



## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

१. उपलब्धतेनुसार विद्यार्थी वर्तमानपत्र वाचू लागले.

२. टि. व्ही. वर बातम्या पाहण्याचे मुलांमधील प्रमाण वाढले.

३. बाल लैंगिक अत्याचाराबाबत बालक सज्ञान झाले.

४. बालक आपल्या शरीराचे सुरक्षित व असुरक्षित अवयव याबाबत आत्मविश्वासपूर्वक माहिती देवू लागले.

५. बालक आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींपैकी सुरक्षित व असुरक्षित व्यक्ती याबाबत स्पष्टपणे वर्गीकरण करू लागले.

६. बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा पोक्सा बाबत विद्यार्थी सज्ञान झाले.

७. आपल्यावर लैंगिक अत्याचारासारखा वाईट प्रसंग ओढवला तर करवयाच्या उपाययोजना विद्यार्थी स्पष्टपणे सांगू लागले.

८. चाईल्ड हेल्पलाईन बद्दल बालक स्पष्टपणे माहिती देवू लागले.

९. सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याबाबत बालक पूर्णपणे आत्मविश्वासपूर्वक सज्ञान झालेले दिसले.

१०. एकंदरीत बालकामध्ये संबंधित विषयाबद्दल ज्ञान, जागृती आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

# उपक्रमाची अंमलबजावणी करताना आलेल्या अडचणी

सदर उपक्रम राबवत असताना विषय हा लैंगिक शिक्षणाशी असल्याने सर्व विद्यार्थ्यांना एकत्रितपणे प्रशिक्षण देणे थोडे अयोग्य वाटत होते. त्यामुळे सदर उपक्रम राबविताना शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांना दोन वेगवगळ्या  सत्रांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. जेणेकरून मुले व मुलींना संकल्पना समजावून सांगणे सोपे झाले.

सदर उपक्रम पूर्व प्राथमिक स्तरावरील मुलांना राबविताना अडचणी आल्यामुळे फक्त ५ वी ते ७ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सदर प्रशिक्षण देण्यात आले.

उपक्रमातील संकल्पना सुलभपणे मांडता याव्यात यासाठी

बाहुलीचा योग्य वापर करण्यात आला त्यामुळे विद्यार्थ्यांना संकल्पना स्पष्ट होणे सोयीस्कर झाले.

# पूर्वचाचणी आणि उत्तर चाचणीमधील गुणपत्रक

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | पूर्वचाचणी गुण | उत्तरचाचणी गुण |
|---|---|---|---|---|
| १ | कानकेकर रोहीत रघुनाथ | ७वी | ३ | १८ |
| २ | मुल्लानी सलमान आसिफ | | ४ | १९ |
| ३ | पाटील सुमित राजाराम | | २ | १७ |
| ४ | बोभाटे दिपक प्रकाश | | ३ | १५ |
| ५ | कांबळे निवृत्ती जयसिंग | | ४ | १८ |
| ६ | बापट अरूष हेमंत | | ५ | १९ |
| ७ | सावंत साहिल कृष्णात | | ६ | २० |
| ८ | कदम समरजित दिपक | | ४ | १८ |
| ९ | म्हालदार नेहाल रमजान | | १ | १७ |
| १० | कदम प्रथमेश सुरेश | | २ | १६ |
| ११ | जिनगरे सुरज कृष्णात | | ४ | १८ |
| १२ | गुरव स्नेहल दिलीप | | ३ | १९ |
| १३ | म्हस्कर श्रावणी संतोष | | २ | २० |
| १४ | गुरव वैष्णवी विनोद | | १ | २० |
| १५ | पाटील नम्रता युवराज | | २ | १८ |
| १६ | पाटील साक्षी नंदकुमार | | ३ | २० |
| १७ | सुतार ऋषाली राजेंद्र | | २ | २० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | सावंत स्नेहा सुभाष | | १ | १८ |
| १९ | ऱ्हायकर ऋतुजा तानाजी | | ३ | १९ |
| २० | चव्हाण स्वप्नाली अंकुश | | १ | १९ |
| २१ | भुतल वैष्णवी विश्वास | | १ | १९ |
| २२ | कदम अमृता लहू | | ४ | १८ |
| २३ | जिनगरे साक्षी कृष्णात | ७वी | २ | १७ |
| २४ | फाले नम्रता नाऊ | | ३ | १८ |
| २५ | जिनगरे शिवानी श्रीपती | | २ | १८ |
| २६ | पाटील पार्थ बाळू | | १ | १७ |
| २७ | कांबळे राजकुमार अशोक | | १ | १७ |
| २८ | कांबळे तुषार नामदेव | ६ वी | ४ | १९ |
| २९ | कांबळे रूद्र भिकाजी | | ३ | १९ |
| ३० | गुरव आर्यन सुनिल | | ३ | १८ |
| ३१ | म्हस्कर सोहम सचिन | | ४ | २० |
| ३२ | कुंभार राज सचिन | ६वी | २ | २० |
| ३३ | हारूगले हर्षद विलास | | ५ | १९ |
| ३४ | सावंत शरविल आनंदा | | ३ | १८ |
| ३५ | सावंत हर्षवर्धन सुभाष | | २ | १८ |
| ३६ | कदम वेदांत देवदास | | १ | १७ |
| ३७ | कांडर अर्जुन मारूती | | ३ | १८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | कांबळे तृप्ती राहूल | | ४ | १८ |
| ३९ | पाटील प्राजक्ता पंडित | | २ | १८ |
| ४० | पाटील लावण्या मनाजी | | १ | १७ |
| ४१ | गुरव कल्याणी मारूती | | २ | १७ |
| ४२ | पाटील दिक्षा सर्जेराव | ६वी | २ | १९ |
| ४३ | सावंत चांदणी दिपक | | ३ | १९ |
| ४४ | भूतल प्रतिक्षा सुरेश | | ४ | १८ |
| ४५ | काटे शिवानी राजेश | | २ | १९ |
| ४६ | कदम संग्राम संजय | | २ | १९ |
| ४७ | कदम अमेय युवराज | | २ | १८ |
| ४८ | जिनगरे प्रतिक भिकाजी | | ३ | १७ |
| ४९ | कदम यश प्रकाश | | ४ | १७ |
| ५० | भुतल समर्थ सुरेश | | ३ | १८ |
| ५१ | गुरव देवराज दिलीप | ५वी | ४ | १८ |
| ५२ | पाटील श्रेयश नंदकुमार | | २ | १९ |
| ५३ | पाटील दिपक नामदेव | | २ | १७ |
| ५४ | पाटील रविंद्र राजाराम | | ३ | १८ |
| ५५ | कांबळे श्रेयश युवराज | | ३ | १९ |
| ५६ | कांबळे पार्थ लक्ष्मण | | ४ | १८ |
| ५७ | सावंत सलोनी कृष्णात | | १ | १८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८ | कदम देवयानी दिपक | ५वी | २ | १७ |
| ५९ | वडाम सलोनी रामचंद्र | | ३ | १९ |
| ६० | कदम आर्या सुनिल | | २ | १९ |
| ६१ | जिनगरे श्रेया राजाराम | | १ | २० |
| ६२ | गुरव स्वरूपा रघुनाथ | | ३ | २० |
| ६३ | म्हालदार सानिया मुबारक | | २ | १९ |
| ६४ | मुल्लानी सब्रिना आसिफ | | २ | २० |
| ६५ | पाटील अपुर्वा रघुनाथ | | ३ | १८ |
| ६६ | पाटील श्रावणी संभाजी | | १ | २० |
| ६७ | कोतेकर प्रिया संतोष | | ३ | १८ |
| ६८ | पाटील समिक्षा सर्जेराव | | १ | १८ |
| ६९ | म्हस्कर प्रेरणा प्रदिप | | २ | १९ |

## माहितीचे विश्लेषण

१. वरील सारणीवरून पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीतील सरासरी गुण यामध्ये कमालीचा फरक दिसून येतो.

२. हा फरक विषयाचे गांभीर्य लक्षात आणून देणारा आहे. .

३. पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणांवरून मुलांना सदर उपक्रमामधील अंतर्भूत असणारे बऱ्यापैकी घटकांचे आकलन झाल्याचे निदर्शनास येते.

४. त्याचप्रमाणे प्रशिक्षणानंतर घेण्यात आलेल्या प्रश्नोत्तर सत्रामध्ये मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याचे निदर्शनात आले.

५. विद्यार्थी स्वत:हून चांगला वाईट स्पर्श, पोक्सो कायदा माहिती तसेच वाईट प्रसंगी करावयाच्या उपाययोजनांची माहिती देतात.

६. यावरून नवोपक्रमकर्त्याने केलेला नवोपक्रम पूर्णपणे यशस्वी ठरला आहे असे म्हणता येईल.

# निष्कर्ष

१. अज्ञान बालकांना वेळीच योग्य लैंगिक शिक्षण दिले गेले.

२. सुरक्षित व असुरक्षित व्यक्ती यांच्या मर्यादांची जाणीव झाली.

३. सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याबद्दल वेळीच विद्यार्थ्यांच्या मनात जागरूकता निर्माण झाली.

४. कठीण प्रसंगी करावयाच्या उपाययोजनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

५. बाललैंगिक अत्याचारासंबंधीच्या पोक्सो कायद्याबाबत विद्यार्थी अवगत झाले .

६. विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करून पोलिस खात्यास बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये सुलभीकरणास होईलच.

७. सुजाण आणि सुरक्षित बालक घडवण्यास मदत होईल.

८. एकंदरीत बालकांना सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श कसा ओळखावा तसेच यात काय फरक असतो हे शिकण्यास आमच्या उपकरणाने मदत झाली.

## उपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती :

जाणीव स्पर्शाची : वेळीच शिक्षण अन्यायापासून रक्षण या वैज्ञानिक उपक्रमाची अंमलबजावणीपूर्वी शाळेतील विद्यार्थी हे बाललैंगिक अत्याचार, त्याचे परिणाम, कठीण प्रसंगी करावयाच्या उपाययोजना, चांगला वाईट स्पर्श या सर्व बाबतीत अज्ञानी होत.

सदर विषयाचे गांभीर्य त्यांच्यामध्ये दिसत नव्हते. परंतु या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतल्यानंतर वरील सर्व माहिती आत्मविश्वासपूर्वक सांगताना दिसले. यावरून असा निष्कर्ष निघतो की, जर प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत जर एखादा वाईट प्रसंग घडला तर तो विद्यार्थी नक्कीच खचून न जाता स्वत:ची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करेल कारण प्रशिक्षणातमध्ये कठीण प्रसंगी करवयाच्या उपाययोजना याबाबतीत प्रशिक्षणाचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे जर एखाद्या विद्यार्थ्यांच्या समोर जरी एखादी घटना घडली तर तो आत्मविश्वासपूर्वक ती गोष्ट एखाद्या जबाबदार व्यक्तीला सांगू शकेल जणेकरून अज्ञानामुळे लपल्या जाणाऱ्या किंबहुना भीती घालून लपवलेल्या घटना उघडकीस येण्यास खूप मदत होईल.

थोडक्यात समाजामध्ये एक सज्ञान आणि सजग जागृत बालक घडविण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल.

# समारोप

सदर उपक्रमाच्या माध्यमातून समाजामधील वाईट गोष्टींना आळा घालण्यास किंवा अशा घटना रोखण्यास मदत होते.अशा पध्दतीचे प्रशिक्षण झाल्यामुळे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण झाली. हा उपक्रम अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांसाठीही अतिशय उपयुक्त आहे कारण बालक सुरक्षा किट चित्रयुक्त असल्याने कमी वयाच्या बालकांनादेखील समजावून सांगणे सोपे जाते.

अशा पध्दतीचे किट शाळास्तरावर निर्माण करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिल्यास बालकांना तथापि समाजातील सर्वच घटकांना याचा पुरेपुर लाभ होवू शकतो. तसेच बालक जागृत असल्याने अशी एखादी घटना त्याच्या बाबतीत अथवा त्याच्या समोर घडली तर ती लगेचच उघडकीस येऊ शकते. यामध्ये या प्रशिक्षणामुळे बालकाच्या मनात निर्माण झालेल्या जाणीव आणि जागृती यांचा निश्चितच मोलाचा वाटा असेल.

# आभार

सदर उपक्रम राबवत असताना खालील सर्व मान्यवरांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

१. श्री. आर. व्ही. कांबळे साहेब

(गटशिक्षणाधिकारी पं.स.गगनबावडा)

२.श्री. संगमेश कोडे साहेब

(तहसीलदार गगनबावडा )

३.श्री. रणजित पाटील साहेब

(सहाय्यक पोलिस निरीक्षक गगनबावडा)

४.श्री. आर.आर.कुंभार साहेब

(विस्तार अधिकारी, पं.स.गगनबावडा)

५.श्री. जी.एस.कांबळे साहेब ( केंद्रप्रमुख, केंद्र शेळोशी)

६.श्री. डी.एस.सावंत सर (मुख्याध्यापक , वि.मं.बावेली)

७.श्री. विपुल प्रभाकर भगत सर (अध्यापक, वि.मं.बावेली)

८.श्री. संदीप शामराव कोरवी सर (अध्यापक, वि.मं.बावेली)

हा उपक्रम राबवण्यासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या सर्व व्यक्तींचे मन:पूर्वक आभार.......

संदर्भसूची

www.mscw.org.in

www.marathi.thewire.in : लेख लैंगिक अत्याचार आणि आपण सर्व

www.mr.survive-northyorks.org.uk :लैंगिक हिंसाचाराबद्दल तथ्ये आणि आकडेवारी

www.maharashtratimes.com : कायद्याच्या मदतीने रोखा बाललैंगिक अत्याचार

YouTube Channel : BBC New, ABP Maza..

# परिशिष्टे

नवोपक्रमासाठी निवडण्यात आलेल्या ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांची यादी पुढीलप्रमाणे.

शाळा : विद्या मंदिर, बावेली. ता. गगनबावडा जि. कोल्हापूर

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | कानकेकर रोहीत रघुनाथ | |
| २ | मुल्लानी सलमान आसिफ | |
| ३ | पाटील सुमित राजाराम | |
| ४ | बोभाटे दिपक प्रकाश | |
| ५ | कांबळे निवृत्ती जयसिंग | |
| ६ | बापट अरूष हेमंत | |
| ७ | सावंत साहिल कृष्णात | |
| ८ | कदम समरजित दिपक | |
| ९ | म्हालदार नेहाल रमजान | |
| १० | कदम प्रथमेश सुरेश | ७वी |
| ११ | जिनगरे सुरज कृष्णात | |
| १२ | गुरव स्नेहल दिलीप | |
| १३ | म्हस्कर श्रावणी संतोष | |
| १४ | गुरव वैष्णवी विनोद | |
| १५ | पाटील नम्रता युवराज | |

| | | |
|---|---|---|
| १६ | पाटील साक्षी नंदकुमार | |
| १७ | सुतार ऋषाली राजेंद्र | |
| १८ | सावंत स्नेहा सुभाष | |
| २० | चव्हाण स्वप्नाली अंकुश | |
| २१ | भुतल वैष्णवी विश्वास | |
| २२ | कदम अमृता लहू | |
| २३ | जिनगरे साक्षी कृष्णात | ७वी |
| २४ | फाले नम्रता नाऊ | |
| २५ | जिनगरे शिवानी श्रीपती | |
| २६ | पाटील पार्थ बाळू | |
| २७ | कांबळे राजकुमार अशोक | |
| २८ | कांबळे तुषार नामदेव | |
| २९ | कांबळे रूद्र भिकाजी | |
| ३० | गुरव आर्यन सुनिल | |
| ३१ | म्हस्कर सोहम सचिन | |
| ३२ | कुंभार राज सचिन | ६वी |
| ३३ | हारूगले हर्षद विलास | |
| ३४ | सावंत शरविल आनंदा | |
| ३५ | सावंत हर्षवर्धन सुभाष | |

| | | |
|---|---|---|
| ३६ | कदम वेदांत देवदास | |
| ३७ | कांडर अर्जुन मारूती | |
| ३८ | कांबळे तृप्ती राहूल | |
| ३९ | पाटील प्राजक्ता पंडित | |
| ४० | पाटील लावण्या मनाजी | |
| ४१ | गुरव कल्याणी मारूती | |
| ४२ | पाटील दिक्षा सर्जेराव | ६वी |
| ४३ | सावंत चांदणी दिपक | |
| ४४ | भूतल प्रतिक्षा सुरेश | |
| ४५ | काटे शिवानी राजेश | |
| ४६ | कदम संग्राम संजय | |
| ४७ | कदम अमेय युवराज | |
| ४८ | जिनगरे प्रतिक भिकाजी | |
| ४९ | कदम यश प्रकाश | |
| ५० | भुतल समर्थ सुरेश | |
| ५१ | गुरव देवराज दिलीप | |
| ५२ | पाटील श्रेयश नंदकुमार | ५वी |
| ५३ | पाटील दिपक नामदेव | |
| ५४ | पाटील रविंद्र राजाराम | |

| | | |
|---|---|---|
| ५५ | कांबळे श्रेयश युवराज | |
| ५६ | कांबळे पार्थ लक्ष्मण | |
| ५७ | सावंत सलोनी कृष्णात | ५वी |
| ५८ | कदम देवयानी दिपक | |
| ५९ | वडाम सलोनी रामचंद्र | |
| ६० | कदम आर्या सुनिल | |
| ६१ | जिनगरे श्रेया राजाराम | |
| ६२ | गुरव स्वरूपा रघुनाथ | |
| ६३ | म्हालदार सानिया मुबारक | |
| ६४ | मुल्लानी सब्रिना आसिफ | |
| ६५ | पाटील अपुर्वा रघुनाथ | |
| ६६ | पाटील श्रावणी संभाजी | |
| ६७ | कोतेकर प्रिया संतोष | |
| ६८ | पाटील समिक्षा सर्जेराव | |
| ६९ | म्हस्कर प्रेरणा प्रदिप | |

नवोपक्रम पूर्व व उत्तर चाचणी

शाळा : विद्या मंदिर, बावेली. ता. गगनबावडा जि. कोल्हापूर

विद्यार्थ्याचे नाव :

इयत्ता : हजेरी क्र : गुण :

सूचना : प्रश्न क्र १ ते १३ वाचून होय किंवा नाही रकान्यात √ अशी खूण करा आणि उर्वरित प्रश्नांमध्ये रिकाम्या जागा भरा.

| अ.क्र. | प्रश्न | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | तुम्ही नियमित वर्तमानपत्र वाचता काय? | | |
| २ | बाल लैंगिक अत्याचाराबाबतच्या बातम्या तुम्ही कधी वाचल्या आहेत काय? | | |
| ३ | बाल लैंगिक अत्याचाराबाबत तुम्हाला माहिती आहे काय? | | |
| ४ | बाल लैंगिक अत्याचाराबाबत तुम्हाला काही माहिती आहे काय? | | |
| ५ | आपल्या शरीराचे सुरक्षित आणि असुरक्षित अवयव याबाबत आपणास माहिती आहे काय? | | |
| ६ | आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींपैकी सुरक्षित आणि असुरक्षित व्यक्ती असे वर्गीकरण आपण करू शकाल काय? | | |
| ७ | बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा पोक्सो याबाबत आपणास काही माहिती आहे काय? | | |
| ८ | आपल्यावर जर लैंगिक अत्याचारासारखा वाईट प्रसंग ओढवला तर कोणत्या उपाययोजना कराव्या याबाबात आपणास काही माहिती आहे काय? | | |
| ९ | चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक आपणास माहिती आहे काय? | | |
| १० | सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याबाबत आपणास माहिती आहे काय? | | |

| अ.क्र. | प्रश्न | होय | नाही |
|---|---|---|---|
| ११ | आई वडीलांच्या उपस्थितीत डॉक्टरांनी आपल्या असुरक्षित अवयवांना स्पर्श करणे सुरक्षित आहे काय? | | |
| १२ | शाळेत जात असताना आपल्या किंवा आपल्या मित्राच्या बाबतीत अत्याचाराशी संबंधित घटना घडल्यास ती कुणालाही सांगू नये हे बरोबर आहे काय? | | |
| १३ | बाललैंगिक अत्याचारासंबंधी एखादी घटना तुमच्या अथवा मित्राच्या बाबतीत घडली तर पोलिसांना मदत करायला तुम्हाला आवडेल काय? | | |
| १४ | आपल्या बाबतीत अत्याचारासंबंधी एखादी घटना घडली तर ती प्रथम ..................... किंवा ...... .............. यांना सांगावी. | | |
| १५ | कठीण प्रसंग ओढवल्यावर बालक मदत कक्षाचा क्रमांक ............. हा आहे. | | |
| १६ | एखादा अनोळखी व्यक्ती तुमच्या आई वडीलांचे नाव सांगून शाळेतून तुम्हाला घरी नेत असल्यास . ..................यांची परवानगी घेणे गरजेचे असते. | | |
| १७ | असुरक्षित स्पर्श होत असल्याची जाणीव होताच तुमच्याकडे कोणतेही शस्त्र नसताना सुरक्षेचा उपाय म्हणून तुम्ही काय कराल? .......................................................................... | | |
| १८ | बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे नाव.......................... | | |
| १९ | बाललैंगिक अत्याचारा कायदा .....................साली अंमलात आला. | | |
| २० | तुमच्या बाबतीत तुम्हाला सुरक्षित असणाऱ्या व्यक्तींची नाती लिहा. .................................................................................... | | |

धन्यवाद...